क्र.प्रापण/१३२१ /२१-२३/उपहारगृह/बचत गट
दिनांक – ०४.१०.२०२१

प्रति,
सोबतच्या यादी प्रमाणे

विषय :- वर्ष २०२१-२०२३ या कालावधीसाठी महिला बचत गटामार्फत **यशदातील** उपहारगृह चालविणेसाठी महिला बचत गटाची नेमणुक करण्यासाठी दरपत्रके मागविणेबाबत..

वर्ष २०२१-२०२३ या कालावधीसाठी महिला बचत गटामार्फत यशदातील उपहारगृह चालविणेसाठी महिला बचत गटाकडुन या पत्रासोबतच्या "परिशिष्ट-अ मध्ये महिला बचत गटानी भरुन सादर करावयाचे दरपत्रक" यामध्ये नमुद करण्यात आलेल्या बाबींसाठी महिला बचतगटाच्या लेटरहेडवर बचतगट प्रमुखाच्या स्वाक्षरीने दिनांक ०४.१०.२०२१ ते ११.१०.२०२१ या कालावधीमध्ये दर पत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सादर करण्यासाठीच्या अटी व शर्ती सदरच्या पत्रासोबत परिशिष्ट- १ मध्ये जोडण्यात आलेल्या आहेत. तरी परिशिष्ट १ येथील अटी व शर्तींनुसार आपले दरपत्रक दिनांक ११.१०.२०२१ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत पोहचतील या बेताने निम्नस्वाक्षरिताकडे पाठविण्यात यावेत.

(निबंधक)
यशदा, पुणे

**महिला बचत गटानी भरुन सादर करावयाचे दरपत्रक**

**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,**

राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे – ४११ ००७

०१. दर पत्रक भरणा-या बचत गटाचे नांव व पुर्ण पत्ता :

०२. बचत गटाच्या बाबतीत
दर पत्रक भरणा-याचे नांव व कोणत्या अधिकारात
(जसे सभासद, अध्यक्ष इ.) दरपत्रक भरले आहे तो हुद्दा :

**०३. दरपत्रक**

| अ.क्र | पदार्थांचे नाव | परिमाण/वजन | दर | एसीईसी व यशदा अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी १० टक्के सवलत |
|---|---|---|---|---|
| १. | राईस प्लेट | चार चपात्या, सुकी भाजी (एक वाटी), रस्सा भाजी (१ वाटी), वरण (एक वाटी), भात (१५५ ग्रॅम), दही (५० ग्रॅम), लोणचे व पापड (एक नग) | | |
| २. | पोळी भाजी | तीन चपात्या, पातळ भाजी, लोणचे | | |
| ३. | डाळ भात | १५० ग्रॅम | | |
| ४. | थालीपीठ २ नग | १५० ग्रॅम | | |
| ५. | झुणका भाकर | १५० ग्रॅम (भाकरी २ नग) | | |
| ६. | इडली चटणी सांबर ३ नग | १५० ग्रॅम | | |
| ७. | मेदुवडा सांबर ३ नग | १०० ग्रॅम | | |
| ८. | पराठा २ नग | १०० ग्रॅम | | |
| ९. | पोहे | १०० ग्रॅम | | |
| १०. | उपमा चटणी | १०० ग्रॅम | | |
| ११. | उत्तपा चटणी सांबर | १५० ग्रॅम | | |
| १२. | सामोसा | १०० ग्रॅम | | |
| १३. | वडापाव | १०० ग्रॅम | | |
| १४. | पॅटीस | १०० ग्रॅम | | |
| १५. | भजी | १०० ग्रॅम | | |
| १६. | ओली भेळ | १०० ग्रॅम | | |
| १७. | रगडा पॅटीस | १०० ग्रॅम | | |
| १८. | ब्रेड रोल | १०० ग्रॅम | | |
| १९. | पाणी पुरी | १०० ग्रॅम | | |
| २०. | गोड शिरा | १०० ग्रॅम | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१. | चहा | १०० मिली | | |
| २२. | कॉफी | १०० मिली | | |
| २३. | दुध | १०० मिली | | |
| २४. | लिंबू सरबत | १०० मिली | | |
| २५. | कोकम सरबत | १०० मिली | | |
| २६. | पन्हे | १०० मिली | | |
| २७. | मसाला ताक | १०० मिली | | |
| २८. | दही वटी | ५० ग्रॅम | | |
| २९. | स्वीट | ५० ग्रॅम | | |
| ३०. | फिंगर चीप्स दही/ साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडी | १०० ग्रॅम | | |
| ३१. | मिसळ पाव | १५० ग्रॅम | | |

टिप :- **१.** परिशिष्ट-अ (दरपत्रक) (**Price Bid** मधील अ. क्र. १ "राईस प्लेट" या बाबीच्या दरावर दरपत्रक अंतिम करण्यात येवुन न्युनतम (एल-१). बचतगट निश्चित करण्यात येईल. तथापि ज्या बचत गटाचे अ. क्रमांक १ येथील "राईस प्लेट" या बाबीसाठी न्युनतम दर असतील त्या बचत गटानी अ क्रमांक २ ते ३१ बाबींसाठी इतर बचत गटाचे न्यूनतम दर मान्य करणे बंधनकारक राहील त्यानुसार सर्व वस्तूंचा/खाद्यपदार्थांचा पुरवठा करणे संबंधित महिला बचत गटाला बंधनकारक राहील. ही अट संबंधीत महिला बचत गटाला मान्य नसल्यास व्दितीय स्थानावरील महिला बचत गटाला विचारणा करण्यात येईल व निश्चित केलेले दर हे न्युनतम राहतील.

२. **वरील दर सर्वकरासहीत असतील कराचा वेगळा उल्लेख करु नये.**

**३. सर्व पदार्थांचे दर नमूद करणे आवश्यक आहे.**

४. **वर नमूद पदार्थ यशदा अधिकारी / कर्मचारी व एसीईसी, यशदा येथील विद्यार्थी यांना १० टक्के सवलतीच्या दरामध्ये पुरविणे बचत गटावर बंधनकारक आहे.**

वरील सर्व अटी व शर्ती आम्हास मान्य आहेत.

बचत गटाचे सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी

बचत गटाचे नाव

नोंदणी क्रमांकाचा रबरी शिक्का

# परिशिष्ट - १

YASHWANTRAO CHAVAN YASHADA OF DEVELOPMENT
ADMINISTRATION (YASHADA)

RAJBHAWAN COMPLEX, BANER ROAD, PUNE 411007

फोन नं. (०२०) २५६०८१२३/१२०/१७५

---

## वर्ष २०२१ -२०२३ या कालावधीसाठी यशदातील महिला बचत गटामार्फत उपहार गृह चालविण्याबाबतच्या अटी व शर्ती

| | |
|---|---|
| अंदाजे उलाढाल रक्कम दोन वर्षासाठी | रूपये ९ लक्ष मात्र |
| सुरक्षा ठेव | ३ % (वर नमुद अंदाजित खर्चावर ठेका प्रदान केल्यानंतर) |
| दरपत्रके मागविण्याचा कालावधी | दि. ०४.१०.२०२१ ते ११.१०.२०२१ |

# यशदातील वर्ष २०२१-२०२३ या कालावधीसाठी महिला बचत गटामार्फत उपहारगृह चालविण्यासाठी दरपत्रक मागविण्याबाबत अटी व शर्ती

०१ यशदातील वर्ष २०२१-२०२३ या कालावधीसाठी महिला बचत गटामार्फत उपहारगृह चालविण्यासाठी दिनांक ०४.१०.२०२१ ते ११.१०.२०२१ या कालावधीमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

०२ दरपत्रक सादर करताना पाकीटावर उजव्या कोप-यावर **"महिला बचतगटामार्फत चालविण्यात येणा-या उपहारगृहासाठी दरपत्रक"** असे स्पष्टपणे लिहावे व ते दिनांक ११.१०.२०२१ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळ समाप्त होणेपुर्वी म्हणजेच सांयकाळी ०५.४५ वाजेपर्यंत यशदा येथे आवक-जावक विभागामकध्ये प्रत्यक्ष आणुन देण्यात यावे. विहीत वेळेनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

०२ दरपत्रके मागविण्यासाठीचे पत्र व अट शर्ती महिला बचतगटाच्या माहितीसाठी यशदाच्या www.yashada.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

०३ **दरपत्रकासोबत सादर करावयाची सक्तीची आवश्यक कागद पत्रे :**

१ अटी व शर्तीमधील दरत्रकाच्या नमुन्यामध्ये दर भरून सदरचे दरपत्रक खालील २ ते ५ मध्ये नमुद करण्यात आलेल्या कागदपत्रासह पाकीटामध्ये टाकावे.

२ तत्सम कामाच्या किमान ०५ वर्षे अनुभवाची शासकीय / स्वायत्त संस्थाची प्रमाणपत्रे व तेथील कामासाठी संबंधित पालिकेच्या आरोग्य खात्याचे प्रमाणपत्रे. (उपहारगृह चालविण्याबाबतचा पाच वर्षाच्या (यामध्ये दैनिक मेस अथवा डबे पुरविणे याचा समावेश असणार नाही) कामांच्या अनुभवांची केवळ बचत गटाच्या नावाची प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे व बचत गटाच्या नावाने उपहारगृह चालवित असल्याबाबतची कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.)

३ पुणे महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नागरवस्ती विभाग यांचे नोंदणीकृत बचत गटाचे प्रमाणपत्र किंवा शिफारस पत्र

४ महिला बचत गटाचे स्वत:चे नावाने बँकेमध्ये खाते असलेल्या पासबुकाची अदयावत झेरॉक्स प्रत

५ महिला बचत गटाच्या अथवा महिला बचत गटाच्या अध्यक्षाच्या नावाच्या वैध पॅनकार्डाची झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.

## ०४ परिशिष्ट-अ (दरपत्रक) (Price Bid) :

परिशिष्ट-अ (दरपत्रक) (Price Bid) या नमुन्यामध्ये दराबाबत माहिती भरून वरिल अ कृ. ०३ येथे नमुद करण्यात आलेल्या कागदपत्रासह पाकीटामध्ये टाकुन सादर करावा.

०५ वरील प्रमाणे आवश्यक कागदपत्रे / प्रमाणपत्रे व दरपत्रकामध्ये दर सादर केल्याचे आढळून न आल्यास अशे दरपत्रक अपात्र ठरविण्यात येईल.

## महिला बचत गटामार्फत यशदातील चालविण्यात येणा-या उपहारगृहाबाबत:

यशदा संस्थेत शासकीय अधिका-यांसाठी प्रशिक्षण सत्र तसेच उच्च स्तरीय बैठका/कार्यशाळा आयोजित केली जातात. त्यांच्या बरोबर येणारे वाहनचालक, शिपाई, पोलीस व संस्थेतील अधिकारी -कर्मचा-यांकरिता बचत गटामार्फत सेवा पुरविणे आहे.

०२ संस्थेमध्ये भोजनालयाची इमारत आहे. संस्थेकडून स्वयंपाकाची भांडी, टेबल व खुर्च्या, फ्रीज, वॉटर कुलर, डिपफ्रिझर, गॅसच्या शेगडया व यादीप्रमाणे इतर वस्तूं इत्यादी गोष्टी यशदाकडून उपलब्ध करुन देण्यात येतील. बचत गटाने उत्तम दर्जाचे चविष्ट अन्नपदार्थ पुरविणे अपेक्षित आहे. यासाठी लागणारे अन्नधान्याचे साहित्य बचत गटाने स्वत:ने स्वखर्चाने आणावयाचे आहे, यशदाकडून कोणत्याही प्रकारचे कर्मचारी पुरविण्यात येणार नाहीत.

**बचत गटामार्फत यशदातील उपहारगृह चालविण्याबाबतच्या अटी आणि शर्ती –**

उपहारगृह चालविण्याकरिता पुढील कार्यवाहीचा अवलंब करण्यात येईल.

०१. उपहारगृहासाठीचे दरपत्रक मंजूर झाल्याचे कळविल्यापासून पंधरा दिवसांच्या आत बचत गटाने संस्थेबरोबर रुपये १००/- रकमेच्या स्टँपपेपरवर करारनामा करावा लागेल. कराराची मुळ प्रत यशदाकडे राखुन ठेवण्यात येईल.

०२. उपहारगृहासाठीचे दरपत्रक मंजूर झाल्यानंतर बचत गटाने संस्थेकडे एकूण रक्कमेवर ३ टक्के म्हणजेच रूपये २७०००/- (रूपये सत्तावीस हजार फक्त) एवढी रक्कम बिनव्याजी सुरक्षा ठेव म्हणून ठेवणे बंधनकारक राहील. कराराची मुदत संपल्यानंतर ही रक्कम बचत गटाला त्यांच्याकडून झालेले संस्थेचे नुकसान व पुरविलेल्या साहित्यातील तूट वजा करुन परत करण्यात येईल.

०३. यशदामार्फत उपहारगृहासाठी जागा व भोजन तयार करण्यासाठी लागणा-या वस्तू सोबतच्या यादीनुसार पुरवठा करण्यात येईल. त्या सर्व बचत गटाला वापरासाठी विनामोबदला देण्यात येतील. या व्यतिरिक्त लागणा-या वस्तू बचत गटाने स्वखर्चाने विकत आणाव्या लागतील. उपहारगृहाचा ताबा घेतेवेळी बचत गटाने वरील सर्व वस्तू सुस्थितीत वापरण्यास योग्य आहेत अथवा कसे हे तपासून ताब्यात घ्याव्यात. नंतर काही तक्रार चालणार नाही. या वस्तूंचा वापर बचत गटाने काळजीपूर्वक केला पाहिजे. निष्काळजीपणामुळे किंवा चुकीच्या वापरामुळे नुकसान होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे. नेहमीच्या सतत वापरामुळे काही वस्तूची दुरुस्ती आवश्यक वाटल्यास किंवा निदर्शनास आल्यास बचत गटाने स्वत:च्या खर्चाने तातडीने (२४ तासाच्या आत) दुरुस्ती करुन घेणे बंधनकारक राहील. यादीमधील सर्व वस्तूंवर संस्थेचा मालकी हक्क राहील. संस्थेच्या परवानगी शिवाय यादीमधील नमुद केलेल्या वस्तू संस्थेच्या बाहेर घेऊन जाता येणार नाहीत.

०४. बचत गटाला त्याच्या बाजूने काही अत्याधुनीक यंत्रसामुग्री उपहारगृहात वापरण्यासाठी बसवावयाची असल्यास (भिंत किंवा जमिनीत फिक्स करुन) संस्थेची लेखी परवानगी घेणे बंधनकारक राहील. तसेच सोडून जाताना स्वत:ची सामुग्री यशदाच्या मालमत्तेची नुकसान न करता घेवुन जावी लागेल याची जबाबदारी बचत गटावर राहील. हे करीत असताना संस्थेच्या इमारतीला व अन्य कोणत्याही साधनसामुग्रीचे नुकसान होणार नाही याची दक्षता बचत गटाने घ्यावी. संस्थेच्या मालमत्तेचे नुकसान होत आहे अशी चूक आढळून आल्यास दुरुस्तीपोटी आलेला खर्च बचत गटाच्या देयकातून वसूल करण्यात येईल.

०५.	सोबतच्या यादीनुसार पुरवठा करण्यात आलेल्या वस्तु, उपकरणे, क्रॉकरी इ. साहित्य नियमितपणे स्वच्छ करुन ठेवणे. जर वस्तू अस्वच्छ व घाण आढळल्यास त्यासाठी रुपये ५०/- प्रती वस्तू इतका दंड बचत गटाला आकारण्यात येईल.

०६.	उपहारगृहातील गॅसबर्नरची साफसफाई व देखभाल बचत गटाने स्वत: करावे. तसेच बचत गटाच्या प्रत्यक्ष वापराच्या वेळी गॅस बर्नरची तुट-फुट होवून नादुरुस्त झाल्यास बसविण्यात आलेल्या स्पेअरपार्टसची किंमत व येणा-या खर्चाची रक्कम बचत गटाने संबंधित एजन्सीला अदा करावी. गॅस सिलेंडरची आणि त्यापासून उद्‌भवू शकणा-या सर्व धोक्यांची जबाबदारी बचत गटावर राहील. त्याच्या देखभालीची तसेच सुरक्षित कामकाजाचीही पूर्ण जबाबदारी सदर बचत गटावर राहील.

०७.	बचत गटामार्फत उपहारगृहात काम करणा-या प्रत्येक कर्मचा-याची वैद्यकीय तपासणी नेमणूक करण्यापूर्वी आणि त्यानंतर दर सहा महिन्यातून एकदा बेसिक रिक्वार्यड टेस्ट कॅटरिंग एफएमडी सर्व्हिसेस साठी आवश्यक असणारी तपासणी संस्थेतील वैद्यकीय अधिका-यामार्फत करुन घेऊन तसा अहवाल मा महासंचालक, यशदा यांनी निर्देशित केलेल्या अधिका-याकडे सादर करावा. वैद्यकीय अधिका-यांच्या तपासणीमध्ये शारिरीकदृष्टया अपात्र असलेल्या कोणत्याही महिलेला बचत गट यशदाच्या आवारात कामासाठी ठेवणार नाही. कामावर असलेल्या बचत गटाच्या कोणत्याही कामगारास शारिरीक, सांसर्गिक व्याधी असल्याचे निदर्शनास आल्यास सदरची बाब तात्काळ बचत गटाच्या निदर्शनास आणण्यास येईल अशी बाब निदर्शनास आल्यानंतर बचत गटाने सदर कामगारास तात्काळ यशदाच्या आवारातून दुर करावयाचे आहे.

०८.	दैनंदिन अंतर्गत वापरासाठी यशदा मार्फत उपहारगृहामध्ये एक विस्तारीत दुरध्वनीसंच पुरविण्यात येईल, त्यासाठी कोणत्याही प्रकारचे भाडे आकारले जाणार नाही.

०९.	उपहारगृहाने स्वत:च्या खर्चाने किचनचा पूर्ण भाग, किचन ओटा, भांडी धुण्याची जागा, धान्यांचे भांडारगृह, स्वत:चे कक्ष, गॅस स्टोरेज, किचनचे टाईल्स तसेच प्लॅटफॉर्म नियमितपणे स्वच्छ ठेवणे बंधनकारक राहील, कोणत्याही प्रकारची दुर्गंधी अस्वच्छ व घाणेरडे डाग भिंतीवर अथवा फरशीवर ठेवू नयेत. स्वच्छता कशी राहील याबाबत गांभीर्याने दखल घ्यावी. स्वच्छतेसाठी Standard Cleaning Material वापरण्यात यावे. अस्वच्छता दिसून आल्यास रुपये ५०/- दंड आकारण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१०.	उरलेले शिळे अन्न/ खरकटे ब्लॅक प्लॅस्टिक डिसपोझेबल बॅग मध्ये बंद करुन कचरा महानगरपालिकेच्या कचरापेटीत किंवा दररोज येणा-या महानगरपालिकेच्या कचरा गाडीमध्ये टाकावा इतर कोणत्याही ठिकाणी टाकु नये. अशी घटना घडल्याचे दिसून आल्यास प्रती दिनी रुपये ५०/- दंड आकारण्यात येईल.

११.	बचत गटाने उपहारगृह चालविण्यासाठी महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याचा परवाना तसेच नियमाप्रमाणे आवश्यक असलेले महानगरपालिकेचे सर्व परवाने स्वखर्चाने काढले पाहिजेत व त्याची मुळ प्रत यशदाला ठेका मिळाल्यापासुन ३० दिवसांच्या आत जमा करणे आणि त्याचे नुतनीकरण वेळोवेळी करणे आवश्यक आहे.

१२.	उपहारगृहाचा उपयोग फक्त संस्थेचे प्रशिक्षणार्थी, बाहेरुन येणारे वाहनचालक, शिपाई, पोलीस शिपाई, डॉ आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे विद्यार्थी व संस्थेचे अधिकारी-कर्मचारी इतर शासकीय विभागाकडुन यशदा येथे आयोजित केलेल्या कार्यशाळा/प्रशिक्षण सत्रे/चर्चासत्रे व अन्य कार्यक्रमासाठी यशदाने निश्चीत केलेल्या

दराप्रमाणेच आकारणी करण्यात यावी. याबाबत वेगळे असे शुल्क किंवा वेगळा मेनू देण्यात येवू नये. या व्यतिरिक्त इतर कोणासही या ठिकाणी सेवा देता येणार नाही. तसेच बचत गटास यशदाच्या उपहागृहामध्ये कोणत्याही प्रकारचे अन्न पदार्थ शिजवून/तयार करुन बाहेर घेवून जाता येणार नाही. असा प्रकार आढळल्यास प्रत्येक प्रकारास रुपये १००/- इतका दंड बचत गटास आकारण्यात येईल.

१३. बचत गटाला आठवडयाच्या सर्व दिवशी (शनिवार, रविवार आणि सुटीचे दिवस धरुन) आवश्यकतेनुसार व सूचनेनुसार उपहारगृहाची सेवा संस्थेच्या आवारात उपलब्ध करुन द्यावी लागेल.

१४. सर्व पदार्थ उपहारगृहात तयार करणे बंधनकारक राहील. पदार्थ बाहेर तयार करुन पुरवठा केल्याचे दिसुन आल्यास अशा प्रत्येक घटनेसाठी रुपये १००/- दंड आकारण्यात येईल.

१५. उपहारगृह येथे उंदीर, घुशी, झुरळे, माशा इ. किटकांचा उपद्रव होणार नाही याची पूर्ण दक्षता बचत गटाने घ्यावी. यासाठी संस्थेकडून Pest Control उपाययोजना करण्यात येईल.

१६. महासंचालक, यशदा यांनी प्रधिकृत केलेला अधिकारी किंवा संस्था यांना उपहारगृहाची तपासणी करण्याचा अधिकार राहील. तसेच या अधिका-यांना बचत गट पुरवित असलेल्या अन्न पदार्थांची तपासणी करण्याचाही अधिकार राहील.

१७. महासंचालक, यशदा यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यांमार्फत सुचना आल्यास संस्थेत आलेले पाहुणे, अभ्यागत वक्ते व इतर यांना चहा/कॉफी/जेवण इत्यादींचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१८. महासंचालक यशदा यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-यामार्फत यांनी वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे बचत गटाला पालन करावे लागेल. मा महासंचालक, यशदा अथवा निबंधक, यशदा यांनी प्राधिकृत केलेल्या अधिका-याची दैनंदीन उपहारगृहारवर देखरेख राहील.

१९. बचत गटाने ठरलेल्या वेळे प्रमाणे/ लेखी दिलेल्या वेळेनुसार उपहारगृहातील सुविधा देणे बंधनकारक राहील. तसेच उपहारगृहातील पदार्थांचा दर्जा किंवा चव योग्य ठेवण्याचे बचत गटावर बंधनकारक राहील. यापैकी कोणत्याही प्रकारच्या त्रूटी आढळल्यास बचत गटास रुपये १००/- दंड आकारण्यात येईल.

२०. संस्थेमार्फत पुरविण्यात आलेले क्रॉकरी/कटलरी/स्वयंपाकाची भांडी/ साहित्य इत्यादी ठेका संपल्यावर किंवा दरम्यान इनव्हेंटरी (Inventory) केल्यावर आढळून आलेले गहाळ (Shortage) वस्तू पोटी संस्थेला वस्तुला वस्तू किंवा वस्तूची खरेदीची किंमत भरपाई पोटी भरणा करणे बंधनकारक राहील. तसेच जड वस्तू उदा. Defreeze Refrigerator, Grinder, machine, Cooking Range इत्यादी नादुरुस्त वस्तुंच्या दुरुस्तीचा खर्च आपल्याकडून वसुल करण्यात येईल. त्याचप्रमाणे तुटफुट (Unserviceable Item) वस्तू पोटी खरेदीच्या किंमतीमध्ये एक वर्षासाठी १५ टक्के सवलत देऊन उर्वरीत रक्कम संस्थेकडे भरणा करणे बंधनकारक राहील. रक्कमेचा भरणा न केल्यास सुरक्षा ठेवेतून वजा करण्यात येईल.

२१. करार कालावधीमध्ये बचत गटाची सेवा असमाधानकारक (पदार्थांची गुणवत्ता योग्य दर्जाची नसणे, आरोग्य विभागाच्या अन्न व औषधी द्रव्य विभागाच्या तपासणीनुसार पदार्थामध्ये भेसळ आढळणे, वेळेवर जेवण/ भोजन सुविधा न पुरविणे) आढळून आल्यास संस्थेमार्फत मा. महासंचालक, यशदा यांचे मान्यतेने ठेका रद्द करण्याची

३० दिवसांची नोटीस देण्यात येईल, त्याच प्रमाणे बचत गटामार्फत ठेका रद्द करावयाचा झाल्यास बचत गटाने संस्थेला ६० दिवसांची आगाऊ नोटीस देणे बंधनकारक राहील.

२२. या कराराच्या एखाद्या कलमाच्या अर्थाविषयी शंका किंवा वाद उपस्थित झाल्यास मा. महासंचालक, यशदा यांचा निर्णय अंतिम राहील आणि तो सर्वांवर बंधनकारक राहील.

२३. या करारास पुणे शहरापुरतेच न्यायाधिकार कक्ष (Legal Jurisdiction) मर्यादित राहील.

२४. पुढील नमूद असमाधानकारक बाबी पैकी कोणत्याही एका कारणास्तव मा. महासंचालक, यशदा यांचेकडून बचत गटाचे काम काढुन घेण्यात येईल.

असमाधानकारक सेवेच्या बाबी -

अ) पदार्थांची गुणवत्ता योग्य दर्जाची नसणे.

ब) आरोग्य विभागाच्या / अन्न व औषधी द्रव्ये विभागाच्या / महानरग पालिकेच्या तपासणीनुसार पदार्थामध्ये भेसळ आढळणे.

क) वेळेवर जेवण/ भोजन सुविधा न पुरविणे.

२५. गटातील महिला सदस्यांनी स्वत: उपहारगृह चालविणे बंधनकारक आहे. सदर उपहारगृह हे दुस-यां महिला बचत गटांला चालवायला देता येणार नाही.

२६. परिशिष्ट-अ (दरपत्रक) (Price Bid मधील अ. क्र. १ "राईस प्लेट" या बाबीच्या दरावर दरपत्रक अंतिम करण्यात येवुन न्युनतम (एल-१). बचतगट निश्चित करण्यात येईल. तथापि ज्या बचत गटाचे अ. क्रमांक १ येथील "राईस प्लेट" या बाबीसाठी न्युनतम दर असतील त्या बचत गटानी अ क्रमांक २ ते ३१ बाबींसाठी इतर बचत गटाचे न्यूनतम दर मान्य करणे बंधनकारक राहील त्यानुसार सर्व वस्तूंचा/खाद्यपदार्थांचा पुरवठा करणे संबंधित महिला बचत गटाला बंधनकारक राहील. ही अट संबंधीत महिला बचत गटाला मान्य नसल्यास व्दितीय स्थानावरील महिला बचत गटाला विचारणा करण्यात येईल व निश्चित केलेले दर हे न्युनतम राहतील.

२७. डॉ आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातील विद्यार्थी व यशदा अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी परिशिष्ट-अ (लिफाफा क्रमांक-२) दरपत्रक मध्ये प्राप्त झालेल्या दरांमध्ये १० टक्के सुट देवून दर निश्चित करण्यात येईल. त्यानुसार १० टक्के सवलतीच्या दरांमध्ये पदार्थ पुरविणे बचत गटावर बंधनकारक राहील. भोजन सुवीधेपोटी देय होणारी रक्कम बचत गटाने दरमहा संबंधित उपभोक्त्याकडून घेणे आवश्यक आहे, याबाबत यशदाची कोणतीही जबाबदारी राहणार नाही.

२८. बचत गटांनी दिलेल्या अनुभव प्रमाणपत्रांच्या आधारे कामाच्या स्थळांना भेट देवून काम समाधानकारकरित्या सूरू/ पूर्ण केले असल्याची पाहणी करून खात्री करण्यात येईल.

# वस्तूंची यादी

| Sr.No | DESCRIPTION OF ARTICLE | No Of Qty. |
|---|---|---|
| 1. | M.S. Bhatti Frame 12"x 12" x 6" Pan Support | 02 Nos. |
| 2. | Iron Kadhai | 02 Nos. |
| 3. | Staainless Steel Glass | 24 Nos. |
| 4. | Maidu Wada Machine | 01 Nos. |
| 5. | Stainless Steel Jug | 06 Nos. |
| 6. | Nearlap Fary Pan | 01 Nos. |
| 7. | Tawa | 01 Nos. |
| 8. | Spoon | 04 Dozen |
| 9. | Fork | 04 Dozen |
| 10. | Chimta | 01 Nos. |
| 11. | Sandshi | 01 Nos. |
| 12. | Puri Picup | 01 Nos. |
| 13. | Stainless Steel Top with Cover | 06 Nos. |
| 14. | Service Donga – 26" | 01 Nos. |
| 15. | Service Donga – 28" | 01 Nos. |
| 16. | Service Donga – 30" | 01 Nos. |
| 17. | Pan Spoon | 02 Nos. |
| 18. | Oval Spoon | 01 Nos. |
| 19. | Pali | 01 Nos. |
| 20. | Rice Spoon | 02 Nos. |
| 21. | Palta | 01 Nos. |
| 22. | Zara | 01 Nos. |
| 23. | F Spoon | 01 Nos. |
| 24. | Stainless Steel Dabba | 10 Nos. |
| 25. | Stainless Steel Plates | 72 Nos. |
| 26. | Stainless Steel Wati Big | 50 Nos. |
| 27. | Stainless Steel Wati Small | 50 Nos. |
| 28. | Hawking Stainless Steel Cockers – 8 Ltr | 01 Nos. |
| 29. | Hawking Stainless Steel Cockers – 10 Ltr | 01 Nos. |
| 30. | Tea Yarns (5 Ltr.) 50 Cups | 02 Nos. |
| 31. | Plastic Tray | 06 Nos. |
| 32. | Summt Mixer M 864 (5) | 01 Nos. |
| 33. | Palam Tea Cup Saucer | 04 Dozen |
| 34. | Jali | 01 Nos. |
| 35. | Stinless Steel Utensil Set (पातेले) | 05 Nos. |
| 36. | Double Gas Shagdi Bajaj Co. | 01 Nos. |
| 37. | Refrigerator 300 Ltr. Cold Gold Godraj | 01 Nos. |
| 38. | 1 OHP Box Typw Domestic Flore mail (Vinod) | 01 Nos. |
| 39. | Aluminium Pot (पातेले) | 10 Nos. |
| 40. | Tharmas | 02 Nos. |
| 41. | Aluminium IDLI Pot (इडली भांडे) Small | 01 Nos. |
| 42. | Steel Chaina Dis (चायना डिश ) Small | 50 Nos. |
| 43. | Steel Idli Plate | 25 Nos. |

## परिशिष्ट-अ

**महिला बचत गटानी भरुन सादर करावयाचे दरपत्रक**

**यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी,**

राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे – ४११ ००७

०१. दर पत्रक भरणा-या बचत गटाचे नांव व पुर्ण पत्ता :

०२. बचत गटाच्या बाबतीत

दर पत्रक भरणा-याचे नांव व कोणत्या अधिकारात

(जसे सभासद, अध्यक्ष इ.) दरपत्रक भरले आहे तो हुद्दा :

**०३. दरपत्रक**

| अ.क्र | पदार्थांचे नाव | परिमाण/वजन | दर रक्कम रूपये (सर्व करासह) | एसीईसी व यशदा अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी १० टक्के सवलत दर रक्कम रूपये (सर्व करासह) |
|---|---|---|---|---|
| १. | राईस प्लेट | चार चपात्या, सुकी भाजी (एक वाटी), रस्सा भाजी (१ वाटी), वरण (एक वाटी), भात (१५५ ग्रॅम), दही (५० ग्रॅम), लोणचे, व पापड (एक नग) | | |
| २. | पोळी भाजी | तीन चपात्या, पातळ भाजी, लोणचे | | |
| ३. | डाळ भात | १५० ग्रॅम | | |
| ४. | थालीपीठ २ नग | १५० ग्रॅम | | |
| ५. | झुणका भाकर | १५० ग्रॅम (भाकरी २ नग) | | |
| ६. | इडली चटणी सांबर ३ नग | १५० ग्रॅम | | |
| ७. | मेदुवडा सांबर ३ नग | १०० ग्रॅम | | |
| ८. | पराठा २ नग | १०० ग्रॅम | | |
| ९. | पोहे | १०० ग्रॅम | | |
| १०. | उपमा चटणी | १०० ग्रॅम | | |
| ११. | उत्तपा चटणी सांबर | १५० ग्रॅम | | |
| १२. | सामोसा | १०० ग्रॅम | | |
| १३. | वडापाव | १०० ग्रॅम | | |
| १४. | पॅटीस | १०० ग्रॅम | | |
| १५. | भजी | १०० ग्रॅम | | |
| १६. | ओली भेळ | १०० ग्रॅम | | |
| १७. | रगडा पॅटीस | १०० ग्रॅम | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८. | ब्रेड रोल | १०० ग्रॅम | | |
| १९. | पाणी पुरी | १०० ग्रॅम | | |
| २०. | गोड शिरा | १०० ग्रॅम | | |
| २१. | चहा | १०० मिली | | |
| २२. | कॉफी | १०० मिली | | |
| २३. | दुध | १०० मिली | | |
| २४. | लिंबू सरबत | १०० मिली | | |
| २५. | कोकम सरबत | १०० मिली | | |
| २६. | पन्हे | १०० मिली | | |
| २७. | मसाला ताक | १०० मिली | | |
| २८. | दही वटी | ५० ग्रॅम | | |
| २९. | स्वीट | ५० ग्रॅम | | |
| ३०. | फिंगर चीप्स दही/ साबुदाणा खिचडी, साबुदाणा वडी | १०० ग्रॅम | | |
| ३१. | मिसळ पाव | १५० ग्रॅम | | |

टिप :- १. परिशिष्ट-अ (दरपत्रक) (**Price Bid** मधील अ. क्र. १ "राईस प्लेट" या बाबीच्या दरावर दरपत्रक अंतिम करण्यात येवुन न्युनतम (एल-१). बचतगट निश्चित करण्यात येईल. तथापि ज्या बचत गटाचे अ. क्रमांक १ येथील "राईस प्लेट" या बाबीसाठी न्युनतम दर असतील त्या बचत गटानी अ क्रमांक २ ते ३१ बाबींसाठी इतर बचत गटाचे न्यूनतम दर मान्य करणे बंधनकारक राहील त्यानुसार सर्व वस्तूंचा/खाद्यपदार्थांचा पुरवठा करणे संबंधित महिला बचत गटाला बंधनकारक राहील. ही अट संबंधीत महिला बचत गटाला मान्य नसल्यास व्दितीय स्थानावरील महिला बचत गटाला विचारणा करण्यात येईल व निश्चित केलेले दर हे न्युनतम राहतील.

२. **वरील दर सर्वकरासहीत असतील कराचा वेगळा उल्लेख करु नये.**

३. **सर्व पदार्थांचे दर नमूद करणे आवश्यक आहे.**

४. **वर नमूद पदार्थ यशदा अधिकारी / कर्मचारी व एसीईसी, यशदा येथील विद्यार्थी यांना १० टक्के सवलतीच्या दरामध्ये पुरविणे बचत गटावर बंधनकारक आहे.**

वरील सर्व अटी व शर्ती आम्हास मान्य आहेत.

बचत गटाचे सक्षम प्राधिकाऱ्याची स्वाक्षरी

बचत गटाचे नाव

नोंदणी क्रमांकाचा रबरी शिक्का